दैनिक महाराष्ट्र
www.esuryodaylive.com
Email : suryodaykokan.123@gmail.com

# सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे
भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती)




कोकण || वर्ष २ रे || अंक २०४ || शनिवार ०६ जुलै २०२४ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||

## दापोली बाजारपेठ येथे एका लॉजवरील अनैतिक व्यवहारावर पोलीसांचा छापा..

एक महिला व एजंट वर गुन्हा दाखल...

दापोली ०५:- भर बाजारपेठेतील एका लॉजमध्ये अनैतिक मानवी वाहतूक व्यापार प्रतिबंध विभागाच्या पथकाने काल दि.४जून गुरूवारी दुपारी ३.१० च्या सुमारास छापा मारून एक महिला व एक पुरूष अशा दोन संशयितांना ताब्यात घेतली असून त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत दापोली पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,

दापोली शहरातील एका लॉजमध्ये देहविक्री व्यवसाय सुरू असल्याची माहिती मिळाल्यावर पोलिसांच्या पथकाने तेथे धाव घेतली.

त्या अगोदर एक डमी गिऱ्हाईक म्हणून या लॉजमध्ये पाठवण्यात आले. या डमी ग्राहकाने या लॉजमध्ये असलेल्या एका व्यक्तीला दोन हजार रुपये दिले. लॉज मधील खोली क्रमांक तीन मध्ये एक महिला बसली होती. त्यानंतर पंचांसमक्ष या व्यक्तीची झडती घेण्यात आली असता या डमी ग्राहकाने दिलेले दोन हजार रुपये या व्यक्तीच्या पॅन्टच्या खिशात सापडले.

ही व्यक्ती या सर्व व्यवहारात मध्यस्थ म्हणून काम करत होती. तर व्यवसाय करणारी महिला ही स्थानिक आहे. या पथकाने या दोन्ही संशयिताच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

या छाप्यात अनैतिक मानवी वाहतूक व्यापार प्रतिबंधक विभागाच्या उपनिरीक्षक गायत्री पाटील, हेड कॉन्स्टेबल सांची सावंत, सुभाष भागणे, नितीन डोमणे, शांताराम झोरे तर दापोलीचे पोलीस निरीक्षक विवेक अहिरे उपनिरीक्षक यादव, गंगधर, चव्हाण सहभागी झाले होते. या घटनेचा अधिक तपास दापोली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विवेक अहिरे करित आहेत.

या घटनेनंतर दापोली शहरालगत असणा-या एका गावातही खुलेआम अनैतिक देहविक्रिचा व्यवहार होत असल्याच्या चर्चेला उधाण आले आहे.

# गोरेगांव विभागातील शालेय विद्यार्थिनीचा विनयभंग !

एका वर्षात ही दुसरी घटना. आशा वातावरण मुळे पालक भयभीत

नांदवी गोरेगावं- नितेश पुरारकर

रायगड जिल्हातील गोरेगावं विभागात अल्पवयीन मुली विकृत मानसिकतेच्या नाराधमाचे चे शिकार होताना दिसत आहे.. विद्यार्थिनींची छेड काढणे, त्यांचा पाठलाग करणे आशा घटना वारंवार होतं असताना दिसत आहे .यामुळे शालेय विद्यार्थिनीच्या मनात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तसेच पालकांना देखील आपल्या मुलींना शिक्षणा करता इतर ठिकाणी पाठवणे धोक्याचे ठरत आहे.गोरेगांव पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका घटनेत छेड काढणाऱ्या एका युवकाला जमवाने पकडून त्याला गोरेगावं रायगड पोलीस ठाणे येथे जमा केले. दि. ०२ जुलै २०२४ रोजी १७ वर्षीय विद्यार्थिनी दुपारी ०१.४५ च्या सुमारास क्लास करिता गोरेगांव येथे जाण्यासाठी वाकी फाट्यावर वाहनाची वाट पाहत असताना , आरोपी सुहेल इस्माईल इसाने ( २८ ) याने आपल्या ताब्यातील मॅक्झीमो ( एम. एच. ०६ बी. ई. २०२९ ) वाईट हेतून फिर्यादी यांना हाताने इशारा करुन गाडी थांबवून बसण्यास सांगितले.पुढे प्रवास करीत असताना तिला तिचे नाव आणि पत्ता विचारण्याचा प्रयत्न केला तसेच कोणत्या वेळेला शाळेत व क्लास जाते येते अशी विचारणा केली आणि तिच्याकडून तिचा मोबाईल नंबर ची मागणी केली.परंतू विद्यार्थिनीने कोणत्याही प्रश्नाचे उत्तर



दिले नाही. पण आरोपीने त्याचे प्रयत्न चालू ठेवले. पिडीत विद्यार्थीनीस स्त्री मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून विनयभंग केला. सदर धोका लक्ष्यात येता विद्यार्थिनीने त्याला बाजूला ढकलले व चेतावणी सुद्धा दिली. परंतू विकृत मानसिकता असलेला आरोपी सुहेल इस्माईल इसाने याला विद्यार्थिनी अल्पवयीन असल्याचे माहीत असून व वाहनामध्ये इतर कोणीही नसल्याचा फायदा घेत त्याने विद्यार्थिनीचा विनय भंग केला असून आरोपी सुहेल इस्माईल इसाने यावर ९३/२०२४ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ७४, ७५ ( २ ), ७८ ( २ ), ७९ सह बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम १२ अन्वये कार्यवाही करण्यात आली आहे व पुढिल तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. विजय सुर्वे करीत आहेत.

## एस टी सवलत पासाचे अर्ज व ओळखपत्राचे पैसे श्री रत्नागिरीचा राजा गणेशमंडळ देणार: उद्योगमंत्री सामंत

रत्नागिरी,(प्रतिनिधी): पाचवी ते बारावी पर्यंतच्या मुलींना एस्टी प्रवासासाठी अहिल्याबाई होळकर मोफत पास सवलत योजना राबविण्यात येते. मात्र त्या पासाचे अर्ज व ओळखपत्रासाठी पालकांना पैसे भरावे लागतात. श्री रत्नागिरीचा राजा गणेशोत्सव मंडळाचा मी अध्यक्ष असून या मंडळातर्फे हे पैसे राज्य परिवहन मंडळाकडे भरणार आहोत. राज्यातील या विधायक उपक्रमाची सुरूवात रत्नागिरी जिल्ह्यातून होईल, असा विश्वास राज्याचे उद्योगमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांनी पत्रकार परिषदेमध्ये व्यक्त केला.ङ्गराज्य परिवहन महामंडळाकडून पाचवी ते बारावी पर्यंतच्या मुलींना मोफत पास देण्यात येत असला तरी यापुढे त्यासाठी लागणारा अर्ज व ओळखपत्राचेही पैसे पालकांना भरावे लागणार नाहीत. रत्नागिरी जिल्ह्यात सातत्याने विविध विधायक उपक्रम राबविण्यात येत असून त्याची दखल राज्यातील अनेक जिल्ह्यांना घ्यावी लागली आहे. नियोजन मंडळाकडून गोळप व शृंगारतळी ग्रामपंचायतीसाठी सौर उर्जा प्रकल्प राबविण्यात येत आहे. यामुळे गावातील पथदीपासाठी विजबिलाचा खर्च शून्यावर येण्यास मदत होणार आहे. टॅलेंट सर्च करून जिल्हा परिषदेच्या शाळामधील निवडक मुले अमेरिकेत जावून नासाला भेट देवून आली. या दोन्ही उपक्रमाची दखल राज्यातील विविध मंत्र्यांनी घेतली. या उपक्रमाची माहिती घेत त्यांच्या जिल्ह्यात हे उपक्रम राबविण्याचे नियोजन करत आहेत. या दोन्ही उपक्रमाप्रमाणे मुलींच्या मोफत पासचीही दखल अन्य जिल्ह्यांना घ्यावी लागेल, असेही उद्योगमंत्री सामंत यांनी सांगितले.ङ्गनुकत्याच सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पाचा लाभ जिल्ह्यासाठीही होणार आहे. 'मुख्यमंत्री लाडकी बहिण योजने'चा लाभ जिल्ह्यातील भगिनींना होणार आहे. तीन मोफत गॅस सिलेंडर, ७५० अश्वशक्ती वीजबिल माफीचा लाभ येथील स्थानिकांना मिळणार आहे. अर्थसंकल्पामध्ये रस्ते, नळपाणी योजनेसाठी भरीव निधी उपलब्ध करून दिला आहे त्यामुळे जिल्ह्यातील प्रलंबित कामांची पूर्तता शक्य होणार आहे. जिल्ह्यात सागरी विद्यापिठ व विधी महाविद्यालच्या मान्यता मिळाली असून आचारसंहिता संपल्यानंतर याबाबत घोषणा होणार आहे.ङ्गपदवीधर आमदार निवडणूकीत महायुतीचे आमदार निरंजन डावखरे मोठ्या मतांनी निवडून येतील असा विश्वास पालकमंत्री सामंत यांनी व्यक्त केला. यावेळी माजी नगरसेवक राजन शेट्ये उपस्थित होते.

## हरिहरेश्वर तीर्थक्षेत्र परिसरामध्ये ४१ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजर

श्रीवर्धन कोलमांडाला

सोपान निंबरे;

हरिहरेश्वर गावचे सुपुत्र प्रशांत केशव लांगी मुंबई पोलीस यांच्या विशेष सहकार्याने श्रीदेव हरिहरेश्वर कालभैरव मंदिर व हरिहरेश्वर समुद्रकिनारा परिसरात ४१ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले. तीर्थक्षेत्र परिसरातील धार्मिक तसेच पर्यटन स्थळी भेट देणाऱ्या भाविकांच्या व पर्यटकांच्या सुरक्षेतेच्या दृष्टीने लांगी यांच्या संकल्पनेतून हे मोलाचे सहकार्य आहे. या सहकार्यातून आपल्या हरिहरेश्वर गावातील महत्त्वाच्या सर्वच ठिकाणी अतिशय चांगल्या पध्दतीने नजर ठेवता येणार आहे. तब्बल ४१ सी सी टी व्ही कॅमेरे असून यामार्फत फेस रीडिंग, वाहनांचे नंबर क्लिअर पणे पाहता येणार आहेत. ज्यामुळे सुरक्षेच्या दृष्टीने अतिशय मोलाचे सहकार्य या यंत्रणेद्वारे संबंधित देवस्थान परिसरातील सुरक्षेच्या दृष्टीने मोलाचे ठरणार आहे. या सीसीटीव्ही सिस्टीमचा लोकार्पण सोहळा हरिहरेश्वर देवघर ग्रामपंचायत



मधील ङ्ग कै. नारायण आत्माराम नागवेकर सभागृह येथे ङ्ग ग्रामपंचायत चे माजी प्रथम महिला सरपंच मॅडम. श्रीमती सुनंदाताई लांगी यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रशांत केशव लांगी, राजू शेटे, ओम प्रकाश कोलथरकर, सुयोग लांगी, धीरज बोरकर, मांडवकर मॅडम, भोसले मॅडम, हरिहरेश्वर देवस्थान चे ट्रस्टी वामन राव बोडस, सचिव सिद्धेश पोवार, ग्रामपंचायत सरपंच अमित खोत, उपसरपंच विजय पाटील, ग्रामसेवक माने, प्रशासकीय तांदळे , आणि पंचक्रोशीतील स्थानिक ग्रामस्थ यांची प्रमुख उपस्थिती होती. ङ्गसंपूर्ण पंचक्रोशीतील सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे नियंत्रण कक्ष ग्रामपंचायतच्या एका दालनामध्ये बसवण्यात आलेले आहे. ङ्गपर्यटकांच्या सुरक्षेच्या संदर्भात आदरणीय लांगीसाहेबांनी उचललेला अतिशय उत्कृष्ट पाऊल...ङ्गगावाप्रती आपली कृतज्ञता भावना यामागे व्यक्त होत आहे. ङ्गतसेच ग्रामपंचायत हद्दीतील सर्वच ग्रामस्थांनी या आपल्या गावच्या लेकराने एवढा मोठा प्रोजेक्ट स्वतः सुरक्षेच्या दृष्टीने लक्षात घेता ग्रामपंचायतीकडे सुपूर्द केला म्हणून आपल्या या लेकराचे गोड कौतुक करत त्याच्या प्रती शुभ आशीर्वाद दिले. ङ्गहरिहरेश्वर पंचक्रोशी मध्ये उपयुक्त ठिकाणी अचूक नियोजन करत कॅमेरे बसवण्याचे उत्तम नियोजन, तसेचङ्गकॅमेऱ्याचे नियंत्रण पाहण्याचे काम प्रथमेश जितेंद्र गुरव हे करनार आहेत.

# लाडकी बहीण योजना! एका कुटुंबात किती महिलांना लाभ – उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली माहिती

मुंबई,(प्रतिनिधी) : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना मार्फत पात्र महिलांना प्रति महिना १५०० रुपये देण्यात येणार आहेत. मात्र, एका कुटुंबातील किती महिला या योजनेचा लाभ घेऊ शकतात? याबद्दल आता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी माहिती दिली आहे.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ''राज्य सरकारने अनेक चांगल्या योजना घोषित केल्या आहेत. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना ही एक अत्यंत महत्वाकांक्षी योजना आहे. या योजनेत काल काही बदल करण्यात आले आहेत. २१ वर्षांपासून तर ६५ वर्षांपर्यंतच्या महिलांना १५०० रुपये महिना देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

यासाठी ५ एकर शेतीची अटही काढून टाकण्यात आली आहे. तसेच अर्ज करण्यासाठी ६० दिवसांची मुदत देण्यात आली आहे. यासोबतच उत्पन्नाच्या दाखल्याची अटही काढून टाकण्यात आली आहे. त्यामुळे मी सर्व भगिनींना विनंती करतो की, कोणीही एजंटच्या मागे लागू नका. एजंट येत असल्यास तक्रार करा'' अशी माहितीही त्यांनी दिली. ङ्गते पुढे म्हणाले की, ''या योजनेचा गैरवापर होऊ नये म्हणून एका कुटुंबात दोन महिलांना या योजनेचा लाभ देण्यात येणार आहे.




एक विवाहित असल्यास एका अविवाहित महिलेलादेखील हा लाभ देण्यात येणार आहे,'' असेही त्यांनी सभागृहात सांगितले. ङ्गअमरावतीमध्ये एका सरकारी कर्मचाऱ्याने गडबड करण्याचा प्रयत्न केला. काल त्याला नोकरीतून निलंबित केले. त्याला बडतर्फ करण्याचाही विचार सरकार करत आहे.

त्याशिवाय सेतू केंद्र किंवा अंगणवाडी सेविकांनी या योजनेत मदत करावी; म्हणून प्रती फॉर्म ५० रुपये राज्य सरकार त्यांना देणार आहे. यावर जर कुठला सेतूकेंद्र चालक पैसे घेत असेल आणि त्याचा पुरावा समोर येईल, त्या सेतू केंद्र चालकाचा परवानाही रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.

याचे आदेश काढले आहेत. या सगळ्या गोष्टी शक्य तितक्या ऑनलाईन करण्याचा आपला प्रयत्न आहे.

यामुळे जास्त वेगाने पैसे देता येतील. सुरुवातीच्या काळात एकाच वेळी जास्त लोक तिथे अर्ज दाखल करण्यासाठी येतात. त्यामुळे सर्व्हर स्लो झाल्याचं पाहायला मिळतंय. पण आता त्याही अडचणी दूर केल्या आहेत. त्यामुळे ऑगस्ट महिन्यापासून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे पैसे लाभार्थ्यांच्या खात्यात जातील, असे ते म्हणाले.

सूर्योदय

शनिवार ०६ जुलै २०२४

gSmmXHS$s¶

## समाजसुधारकांचा देशासाठी जीवन समर्पण

हे वर्ष सर्वांना सुखाचे, समाधानाचे आणि भरभराटीचे जावो, जे कुणी ज्या ज्या क्षेत्रात कार्यरत आहेत, त्यांची या वर्षात भरघोस प्रगती होवो, ज्यांनी ज्यांनी या वर्षात काही मिळवण्याचे संकल्प केलेले आहेत, ते पूर्णत्वास जावोत आणि सगळ्यांच्या मनातील इच्छा, आकांक्षा पूर्ण होऊन त्यांच्या जीवनात आनंदाची आणि उत्साहाची बरसात होवो, सगळ्या महाराष्ट्रातील जनतेच्या जीवनात हे वर्ष सुखसमृद्धी घेऊन येऊ दे, यासाठी वर्षांरंभी महानगरच्या वतीने हे कळकळीचे गार्हाणे महाराजा. महाराष्ट्र हे राज्य नेहमीच पुरोगामी राज्य म्हणून ओळखले जाते. या राज्याला छत्रपती शिवाजी महाराज, शाहू, फुले, आंबेडकर यांच्यासोबत टिळक आणि आगरकर अशा मोठमोठ्या समाजसुधारकांचा आणि देशासाठी जीवन समर्पण करणार्या लोकनेत्यांचा वारसा लाभलेला आहे, मानवी जीवनाला नवी दिशा देणार्या अनेक राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक चळवळींचा उगम महाराष्ट्रातून झालेला आहे.मुंबई, पुण्यासारखी आधुनिक शहरे या राज्यात आहेत. या दोन्ही शैक्षणिक आणि आर्थिक केंद्रांमुळे सगळ्या जगाचे लक्ष भारताकडे आकर्षित होत असते. मोठ्या प्रमाणात जागतिक गुंतवणूक महाराष्ट्राकडे येत आहे. देशाचे पंतप्रधान मूळचे गुजरातचे असल्यामुळे शेजारीच असलेल्या प्रगत महाराष्ट्रासारखी आपल्या राज्याचीही प्रगती व्हावी, असे त्यांना वाटत आहे. त्यामुळे केंद्र सरकार अनेक महत्वाच्या आस्थापना महाराष्ट्रातून गुजरातमध्ये नेत आहे. अलीकडेच महाराष्ट्रातील हिरे व्यापार गुजरातमध्ये नेण्यात आला. मुंबई ते अहमदाबाद या बुलेट ट्रेन प्रकल्पाला गती देण्याचे जोरदार प्रयत्न सुरू आहेत. महाराष्ट्रातील बर्याच कंपन्या गुजरातकडे नेण्यात येत आहेत. त्यावरून महाराष्ट्रातील राजकीय नेते तू तू मै मै करत आहेत. केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी असल्यामुळे त्यांच्या गृहराज्याला जास्त झुकते माप देण्याचा प्रयत्न सुरू आहे, पण ते किती झुकते असावे, याचा मोदींनी विचार करण्याची गरज आहे. कारण ते माप झुकते करताना कलंडले, तर त्याचा अनिष्ट परिणाम होऊ शकतो, त्यामुळे आपण देशाचे पंतप्रधान आहोत. त्यामुळे महाराष्ट्राचाही विचार करण्याची गरज आहे, हा विचार त्यांच्या मनात कायम जागा राहू दे महाराजा. कोरोना आपल्या नव्या भावबंदांच्या माध्यमातून आपलं डोकं पुन्हा वर काढत आहे, त्याला वेळीच ठेचून टाक महाराजा.महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य असले तरी सध्या ते राजकीय अरिष्टामध्ये सापडलेले आहे. राजकीय पक्षांमध्ये गट आणि तट पडलेले आहेत. कोण कुणाची साथ सोडून कुणाचा हात धरेल, याचा काही भरोसा राहिलेला नाही. प्रत्येक राजकीय पक्ष आणि त्यांचे नेते आम्ही हे सगळे जनतेच्या हितासाठी करत आहोत, असे सांगत आहेत. पण प्रत्यक्षात ती वस्तुस्थिती खरोखरच तशी आहे का, हाही एक प्रश्न आहे. राजकीय नेत्यांच्या बदलत्या भूमिका पाहून येणार्या काळात आपण काय करावे आणि किती पक्षांना आणि गटांना कसे मतदान करावे, अशा संभ्रमात मतदार नागरिक पडलेला आहे. त्यामुळेच अनेक मतदारांचा कल नोटाचे बटन दाबण्याकडे होत चाललेला आहे, पण ते चांगल्या लोकशाहीसाठी पोषक नाही. कारण लोकशाहीत लोकांच्या मताला किंमत असते.जनमतावरच लोकशाही टिकून असते. लोकांना आपले मत बाद करावे, असे वाटत असेल तर ते लोकशाहीसाठी सुचिन्ह नाही. त्यामुळे महाराष्ट्रातील राजकीय पक्षांच्या नेत्यांना आपल्या वैयक्तिक स्वार्थापलीकडे जाऊन लोकहिताचा विचार करण्याची सुबुद्धी दे महाराजा, असे म्हणावेसे वाटत आहे. कारण या वर्षात लोकसभा, विधानसभा आणि न्यायालयाचा निर्णय बाजूने लागला आणि सत्ताधार्यांची इच्छा बलवान झाली तर महानगरपालिकांच्याही निवडणुका होणार आहेत. २०२४ हे वर्ष त्यामुळे राजकीयदृष्ट्या कलाटणी देणारे असेल, त्यामुळे निवडणुका लढवताना आपण देशाला मार्गदर्शक ठरणार्या राज्यातील लोकप्रतिनिधी आहोत, याचे भान इथल्या राजकीय नेत्यांना येऊ दे, कारण महाराष्ट्र जर राजकीयदृष्ट्या दिशाहीन झाला, गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली तर त्याचा परिणाम अन्य राज्यांवर होत असतो. महाराष्ट्र देशाचे शक्तिस्थान आहे, त्यामुळे आपल्याला परिपक्वतेने वागायला हवे, हे या नेत्यांच्या लक्षात येऊदे महाराजा. राज्यात सध्या मराठा विरुद्ध ओबीसी असा संघर्ष तीव्र होताना दिसत आहे, त्यात समजूतदारपणाने मार्ग निघू दे महाराजा.सध्या देशात भाजप आणि त्याच्या विरोधात प्रादेशिक पक्ष असा लढा सुरू आहे. राष्ट्रीय पक्ष असलेल्या काँग्रेसची सध्या ताकद कमी झालेली आहे. प्रादेशिक पक्षांची ताकद मर्यादित आहे. त्यामुळे देशात काही राज्यांचा अपवाद वगळता भाजपचा वरचष्मा आहे. भाजपकडे नरेंद्र मोदी यांच्यासारखे प्रभावी नेतृत्व आहे. त्यामुळे मोदी हैं तो

## औद्योगिक प्रशिक्षण संस्था नागोठणेने उभारलेली वृक्षलागवड चळवळ पर्यावरण हित जोपसणारी – प्रसाददादा भोईर

औद्योगिक प्रशिक्षण संस्था नागोठणेत वृक्षारोपण कार्यक्रम

प्रसाद दादा भोईर यांच्या उपस्थितीत असंख्य वृक्षांची लागवड

वृक्षारोपण केलेल्या प्रत्येक झाडाचे संगोपन करण्याचा केला संकल्प

पाली /बेणसे

(धम्मशील सावंत )



पर्यावरणाचे संरक्षण, संवर्धन करण्याच्या उदात्त हेतूने राष्ट्रीय सेवा योजना – औद्योगिक प्रशिक्षण संस्था नागोठणेत वृक्षारोपण कार्यक्रम दि. (०५) शुक्रवारी पार पडला. भाजपा पेण सुधागड रोहा विधानसभा क्षेत्र अध्यक्ष प्रसाददादा भोईर, औद्योगिक प्रशिक्षण संस्था नागोठणेच्या प्राचार्य विद्या पाटील, गटनिदेशक सिद्धार्थ भगत,तसेच विद्यार्थी,शिक्षक वर्ग, यांच्या उपस्थितीत भर पावसात वृक्ष लागवड करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना प्रसाद दादा भोईर म्हणाले कीङ्क झपाट्याने होत असलेले औद्योगिकीकरण म्हणजे विकास असं मानलं जातं, मात्र हा विकास अनेकदा पर्यावरणाला मारक, ठरतो. या दोन्ही मध्ये समतोल राखून विकास साधने गरजेचे आहे. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे सर्व शिक्षक, विद्यार्थी यांनी उभारलेली ही वृक्षलागवड चळवळ पर्यावरण हित जोपासणारी असल्याचे प्रसाददादा भोईर यांनी सांगितले. ङ्कपर्यावरणाचा होणारा ऱ्हास व त्यावर उपाययोजना या अनुषंगाने वृक्षारोपण उपक्रम अंत्यन्त उपयुक्त ठरतोय. ग्लोबल वार्मिंग, हवामान बदल, बदलते ऋतुचक्र यांसारख्या समस्याने संपूर्ण सजीवसृष्टी, वसुंधरा ग्रासली आहे. जैवविवीधतेचा ऱ्हास देखील होत आहे. यावर वृक्षारोपण, वृक्ष संवर्धन, वृक्ष संगोपन हा अंत्यन्त प्रभावी उपाय आपल्याकडे आहे. लागवड केलेले प्रत्येक झाड जगविणे ही आपली कर्तव्य जबाबदारी आहे असे भोईर म्हणाले. प्राचार्य विद्या पाटील यांनी म्हटले की औद्योगिकीकरणासोबत होणारे प्रदूषण याचा करण्यासाठी वृक्ष लागवड करणे गरजेचे आहे. या वर्षीचा उन्हाला प्रचंड तीव्र होता, आपली पृथ्वी हळूहळू गरम होत चालली आहे हे सर्व गोष्टींपासून सुरक्षित राहायचं असेल किंवा पृथ्वी वाचवायचे असेल तर वृक्षारोपण हाच एकमेव उपाय आपल्याकडे आहे. ङ्कऔद्योगिक प्रशिक्षण संस्था नागोठणे चा परिसर भविष्यात हिरवळीने दाटलेला दिसेल. असा विश्वास प्राचार्य विद्या पाटील यांनी व्यक्त केला.– यावेळी पर्यावरणाचे रक्षण, संवर्धन करण्याचा निर्धार करून वृक्षलागवड केलेले प्रत्येक झाडाचे संगोपन करण्याचा संकल्प करण्यात आला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते प्रसाद दादा भोईर, विद्या राजेंद्र पाटील ङ्कप्राचार्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था नागोठणे, गट निदेशक सिद्धार्थ भगत, दिलीप बडे, विद्या बावकर, आदिसह शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## देशात नवीन फौजदारी कायदे लागू ; फसवणुकीसाठी आता कलम ४२० नव्हे ३१६, ३०२ नव्हे तर १०३, ३९९ नव्हे तर ३५६

रायगड जिल्हा उत्तर प्रतिनिधी/ मंगेश यादव

संपूर्ण देशभरात तीन गुन्हेगारी कायदे पाच जुलैपासून बदलणार आहेत. नवीन फौजदारी कायदे लागू होणार आहेत भारतीय दंड संहिता (आयपीसी) मध्ये ५११ कलमी होती मात्र भारतीय न्याय संहितेत ३५८ कलमे आहेत. गुन्हेगारी कायद्यात बदलासह यातील कलमाचा क्रमही बदलण्यात आला आहे. देशात इंग्रजांच्या काळापासून सुरू असलेले तीन गुन्हेगारी कायदे पाच जुलैपासून बदलणार आहेत. डिसेंबर विषय २०२३ मध्ये संसदेत मंजूर करण्यात आलेले कायदे आता देशभरात लागू होणार आहेत. भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक भा. ध अधिनियम याप्रमाणे संबोधले जाणार आहेत. हे कायदे आता भारतीय दंड संहिता १८६० गुन्हेगारी प्रक्रिया संहिता १८९८ आणि भारतीय साक्ष अधिनियम १८७२ यांची जागा घेतील. नवीन कायद्यामुळे न्यायालयीन व्यवस्तेत न्यायालयीन व्यवस्थित बदलांसह तांत्रिक प्रगती होत आहे.ङ्कङ्कन्यायदानाची प्रक्रिया होणार वेगवान ङ्कन्यायाधीश किंवा लोकसेवका विरोधात खटला



चालविण्यासाठी १२० दिवसांमध्ये राज्य शासनाला कळवावे लागेल न कळविल्यास सरकारची सहमती असल्याचे गृहीत धरले जाईल. तब्बल उपस्थित कलमांमध्ये ३५ कलमांमध्ये टॉईमबाँड आखून देण्यात आला आहे . बलात्कार अत्याचाराच्या पुण्यात सात दिवसांमध्ये तपास अधिकाऱ्याला मेडिकल रिपोर्ट पाठवावा लागेल. ९० दिवसांमध्ये पिडीतेला तपासातील प्रगती बाबत कळवावे लागेल सामान्यांना गुन्ह्यातील आरोपी सापडल्यास, पकडल्यास सहा तासाच्या जवळील ठाण्यात हजर करणे बंधनकारक, आतमहत्यते त प्रथमदर्शनी कारणांचा अहवाल २४ तासात पाठवणे बंधनकारक. ङ्क३३ गुन्ह्यातील वाढवण्यात आली आहे. ८३ गुन्हांत दंडाची रक्कम वाढवण्यात आली आहे. २३ गुन्ह्यांत अनिर्वाय किमान शिक्षेची तरतूद आहे. ङ्ककाय आहेत महत्त्वाचे बदल? ङ्ककलम १२४ आयपीसीच्या कलम १२४ मध्ये राजद्रोहाशी संबंधित प्रकरणात शिक्षेची तरतूद आहे. नवीन कायद्यानुसार राजद्रोहाला आता देशद्रोह संभवण्यात येईल. ब्रिटिश काळातील शब्द हटविण्यात आला आहे. कलम १४४ आयपीसीचे कलम १४४ घातक शस्त्र बाळगणे आणि बेकायदेशीर सभेमध्ये सभी होणे याचे संबंधित होते. आता भारतीय न्यायसहितेत परिशिष्ट ११ मध्ये याला सार्वजनिक शांतते विरुद्ध गुन्ह्याच्या श्रेणीत ठेवण्यात आले आहे. आता भारतीय न्यायसंहितेचे कलम १८७ बेकायदेशीर सभेबाबत आहे. ङ्कङ्ककलम ३०२ यापूर्वी हत्तेचया प्रकरणात कलम ३०२ नुसार आरोपी करण्यात येत होती मात्र आता अशा गुन्ह्यांसाठी कलम १०३ नुसार शिक्षा देण्यात येणार आहे.

कलम ३०७ आयपीसीच्या कलम ३०७ नुसार शिक्षा देण्यात येत होती आता अशा जोशींना भारतीय न्यायसंहितेच्या कलम १०९ नुसार शिक्षा सुनावण्यात येईल हे कलम परिशिष्ट सहा मध्ये ठेवण्यात आले ङ्कङ्ककलम ३७६ अत्याचाराचा गुन्हा हा पूर्वी आयपीसीच्या कलम ३७६ अंतर्गत होता भारतीय न्याय संहितेत याला परिशिष्ट पाच मध्ये महिला व मुलांविरुद्धच्या गुन्ह्याच्या श्रेणीत स्थान देण्यात आले आहे. नव्या कायद्यात अत्याचाराची संबंधित गुन्ह्याची शिक्षा आता कलम ६३ अंतर्गत सामूहिक अत्याचार चा गुन्हा आयपीसीच्या कलम ३७६ कलम७० मध्ये येईल. ङ्कङ्ककलम ३९९ अगोदर माननीय प्रकरणात आयपीसी चे कलम ३९९ नुसार कारवाई होत होती नव्या कायद्यात परिशिष्ट १९ अंतर्गत गुन्हेगारी स्वरूपाची धमकी, अपमान, मानहानी आदी प्रकरणात यालाच स्थान देण्यात आले आहे. मानहानीला भारतीय न्याय संहितेच्या कलम ३५६ मध्ये ठेवण्यात आले. ङ्कङ्ककलम ४२० भारतीय न्याय संहितेत फसवणुकीचा गुन्हा कलम ४२० मध्ये नव्हे तर ३१६ नुसार असेल. हे कलम भारतीय न्याय संहितेच्या परिशिष्ट सत्रामध्ये संपत्तीची चोरी या गुन्ह्याच्या श्रेणीत ठेवले आहे. एकूण कलमे ५१२ दुरुस्ती कलमे १७५ नवीन कलमे आठ व रद्द २२ या प्रमाणे देशात नवे फौजदारी काय दे लागू केले आहेत.

## माध्यमिक शिक्षणाधिका–यांकडून पाटपन्हाळे विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा गौरव : ( गुहागर तालुकास्तरीय शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन)

आबलोली ( संदेश कदम)

रत्नागिरी जिल्हा माध्यमिक शिक्षणाधिकारी श्रीम.सुवर्णा सावंत यांनी गुहागर तालुक्यातील न्यू इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय पाटपन्हाळे विद्यालयात शैक्षणिक कार्यानिमित्त नुकतीच भेट दिली.सदर भेटीनिमित्त इ.५वी व इ.८वी शिष्यवृत्ती परीक्षेत गुहागर तालुकास्तरीय सर्वसाधारण ग्रामीण गुणवत्ता यादीमध्ये सुयश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचे शिक्षणाधिकारी श्रीम.सुवर्णा सावंत यांनी गुलाबपुष्प देऊन अभिनंदन केले.ङ्क पाटपन्हाळे विद्यालयातील इ.५ वी शिष्यवृत्ती परीक्षेत गुहागर तालुका सर्वसाधारण ग्रामीण गुणवत्ता यादीमध्ये कु.कुशल वैभवकुमार पवार याने सहावा क्रमांक व रत्नागिरी जिल्ह्यात ९४ वा क्रमांक तसेच कु.सिद्धार्थ अशोक पाष्टे याने तालुकास्तरीय सातवा क्रमांक व जिल्हास्तरीय १५५ वा क्रमांक संपादन केला आहे. तसेच इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत गुहागर तालुका सर्वसाधारण ग्रामीण यादीमध्ये कु.समृद्धी सुरेश आंबेकर




हिने तालुकास्तरीय द्वितीय क्रमांक व रत्नागिरी जिल्हास्तरीय ५५ वा क्रमांक तसेच कु.मृण्मयी दत्ताराम जाधव हिने तालुकास्तरीय पाचवा क्रमांक व जिल्हास्तरीय ९४ वा क्रमांक संपादन केला आहे. इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेतील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांनी सुयश संपादन केल्याबद्दल माध्यमिक शिक्षणाधिकारी सुवर्णा सावंत यांनी शिष्यवृत्ती गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांचे व पालकांचे विशेष अभिनंदन केले. सदरच्या अभिनंदन कार्यक्रमासाठी रत्नागिरी जिल्हा माध्यमिक शिक्षण विभागाचे अधिकारी श्री. चौधरी , श्री.चौगुले , श्री.नाईक , गुहागर तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष मंगेश गोरिवले , पाटपन्हाळे विद्यालयाच्या वरिष्ठ शिक्षिका सौ.एस.एस.चव्हाण , प्रा.श्री.एस.एस.मोरे , शिक्षक आर.एम.तोडकरी , एस.वाय.भिडे , एस.एम.आंबेकर , डी.एस.निंभोरे आदी मान्यवर उपस्थित होते. रत्नागिरी जिल्हा माध्यमिक शिक्षण विभागाच्या शिक्षणाधिकारी तसेच उपशिक्षणाधिकारी व अधिकारीवर्ग यांनी न्यू इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय पाठपन्हाळे विद्यालयाला भेट देऊन शैक्षणिक कामकाजाबद्दल मार्गदर्शन केल्याबद्दल पाटपन्हाळे विद्यालयातर्फे धन्यवाद मानण्यात आले.

# सेंट मेरी प्राथमिक माध्यमिक उच्च माध्यमिक व्यावसायिक कनिष्ठ महाविद्यालय वाहेगाव येथे पालक शिक्षक संघाची स्थापना...

गंगापुर प्रतिनिधी

दिनांक ५ जुलै शुक्रवार २०२४ रोजी सकाळी ठीक अकरा वाजता सेंट मेरी विद्यालय वाहेगाव येथे पालक शिक्षक सभा आयोजित करण्यात आली होती या सभेसाठी प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागातील बहुसंख्य पालक उपस्थित होते सभेच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य रेव्ह. फा. संजय रुपेकर व उपाध्यक्ष म्हणून प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री एस के जाधव सर हे उपस्थित होते

सभेची सुरुवात प्रार्थना गीताने करण्यात आली याप्रसंगी विद्यालयाचे उपप्राचार्य श्री बी.के मनाळ सर यांनी सभेचे प्रास्ताविक केले व त्यामध्ये विद्यालयाचा मागील वर्षीचा अहवाल विद्यालयाने केलेली प्रगती याचा थोडक्यात आढावा घेण्यात आला विद्यालयाचे पर्यवेक्षक श्री ए एम थोरात सर यांनी पालक शिक्षक संघाची रचना व वैशिष्ट्ये समजावून सांगितली व पालक आणि शिक्षकांच्या संमतीने उपस्थित पालक व शिक्षकांमधून पालक शिक्षक संघ व माता पालक संघ यांची स्थापना करण्यात आली ती पुढील प्रमाणे

प्राथमिक विभाग पालक शिक्षक संघ

अध्यक्ष-श्री एस के जाधव सर (मुख्याध्यापक)

उपाध्यक्ष- श्री. गणेश बाळू कुऱ्हाडे (पालक प्रतिनिधी)

*सचिव- श्री. महेश लोखंडे(शिक्षक प्रतिनिधी)

सहसचिव- श्री. दत्तू ज्ञानदेव मनाळ (पालक प्रतिनिधी)

प्राथमिक विभाग माता पालक संघ

अध्यक्ष-श्री एस के जाधव सर (मुख्याध्यापक)

उपाध्यक्ष- सौ. वर्षा अहिरी (पालक प्रतिनिधी)

सचिव- श्रीमती सुनीता गायकवाड (शिक्षक प्रतिनिधी)

सहसचिव- सौ. प्रिया कुऱ्हाडे(पालक प्रतिनिधी)

माध्यमिक व उच्च माध्यमिक विभाग

++पालक शिक्षक संघ++

अध्यक्ष- रेव्ह. फा. संजय रुपेकर (प्राचार्य)

उपाध्यक्ष-श्री प्रदीप दगू पारखे (पालक प्रतिनिधी)

सचिव -श्री बी .के .मनाळ (उप मुख्याध्यापक)

सहसचिव- श्री श्रीकांत तुकाराम हिवाळे (पालक प्रतिनिधी)

माध्यमिक विभाग माता पालक संघ

अध्यक्ष - रेव्ह. फा. संजय रुपेकर (प्राचार्य) सौ सुनीता काकासाहेब पवार (माता पालक) सचिव -श्रीमती ए के वाघमारे (महिला शिक्षिका)ङ्ग सहसचिव - सौ मंदा किरण शिनगारे (माता पालक) पालक शिक्षक संघ व माता पालक संघ यांची निवड केल्यानंतर उपस्थित पालकांच्या संमतीने सहविचार सभेत पुढील ठराव मंजूर करण्यात आले. विद्यालयामध्ये शालेय व सहशालेय उपक्रम यांचे आयोजन करण्यात यावे. राष्ट्रीय सण उत्सव विविध महात्म्यांच्या जयंती पुण्यतिथी दिनविशेष शालेय स्पर्धा क्रीडा दिन स्नेहसंमेलन विविध स्पर्धा परीक्षा वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन स्वच्छता अभियान इत्यादी उपक्रमांचे मासिक व वार्षिक नियोजन पर्यवेक्षक श्री थोरात सर यांनी समजावून सांगितलेङ्गशालेय पोषण आहार तयार करण्यासाठी उपस्थित महिला बचत गटामधून प्राथमिक विभागासाठी एक व माध्यमिक विभागासाठी एक यांची निवड करण्यात आली विद्यालयात वर्षभर पार पाडण्यात येणाऱ्या परीक्षा घटक चाचणी व सत्र परीक्षा यांचे नियोजन पालकांना सांगण्यात आले व विद्यार्थ्यांकडून परीक्षा फी घेऊन परीक्षा सुरळीत पार पाडावी असे पालकांच्या संमतीने ठरविण्यात आले मासिक व वार्षिक नियोजन-विविध शालेय व सहशालेय उपक्रम पार पाडण्यासाठी शिक्षकांच्या एकूण वीस समित्या तयार करण्यात आल्या त्याचप्रमाणे वर्ग अध्यापन यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी घटक नियोजन व मासिक नियोजन याची माहिती पालकांना देण्यात आलीङ्ग विद्यालयातील विद्यार्थ्यांना गणवेश असावा संगणक कक्ष अध्ययवत करण्यात यावा व विद्यार्थ्यांच्या व पालकांच्या संमतीने शैक्षणिक सहलींचे आयोजन करण्यात यावे असे सर्वानुमते ठरविण्यात आलेङ्ग दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी सराव समृद्धी परीक्षांचे आयोजन करण्यात येईल असे ठरविण्यात आलेङ्गशाळा व्यवस्थापन शिक्षक पालक व विद्यार्थी यांच्या सहकार्याने विद्यालयांमध्ये वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन मोहीम राबविण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आलेङ्गसालाबाद प्रमाणे याही वर्षी विद्यालयांमध्ये कॉपीमुक्त अभियान यशस्वीपणे राबवावे असे पालकांनी संमत केल विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी व शाळेची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी विविध ठराव एकमताने मंजूर करण्यात आले या सह विचार सभेसाठी सर्व पालकांचे मोलाचे सहकार्य लाभलेङ्ग शेवटी विद्यालयाचे प्राचार्य रेव्ह. फा. संजय रुपेकर यांनी उपस्थित सर्व पालकांचे मनःपूर्वक आभार मानले व विद्यार्थ्यांच्या व विद्यालयाच्या विकासासाठी वेळोवेळी सहकार्य करण्याचे आवाहन उपस्थित सर्व पालकांना करण्यात आलेङ्ग अशा प्रकारे खेळीमेळीच्या वातावरणात सेंट मेरी विद्यालयांमध्ये पालक शिक्षक सभा संपन्न झाली

# जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा मुंढे येथे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

शिरगाव प्रतिनिधी

श्री स्वामी समर्थ फाउंडेशन व श्री स्वामी समर्थ हॉस्पिटल शिरगाव ता. चिपळूण जि. रत्नागिरी यांच्या एक हात मदतीचा या श्री स्वामी सेवा उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा मुंढे ता. चिपळूण येथील इयत्ता पहिली ते चौथी मधील सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप शासन मुख्यमंत्री माझी शाळा ...सुंदर शाळा या अभियानांतर्गत कोल्हापूर विभागात प्रथम क्रमांक या मुंढे प्राथमिक शाळेला प्राप्त झाला आहे .माननीय मुख्याध्यापक मा नदाफ सर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुंढे मध्ये विविध शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक उपक्रम राबवले जातात. या विविध उपक्रमास श्री स्वामी समर्थ



करण्यात आले व विद्यार्थ्यांना शैक्षणिक मार्गदर्शन करून, नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक श्री मौला गुलाब नदाफ सर, श्रीम. वृषाली विजय सुर्वे मॅडम,श्री .विलास जयराम पवार सर,श्रीम. ज्योती हरिदास भोसले मॅडम ,श्री . रोशन शंकर निकम सर , सौ रक्षिता पंकज डाकवे मॅडम, श्री स्वामी समर्थ फाउंडेशन व हॉस्पिटल शिरगावचे अध्यक्ष डॉ. विशाल पेटकर, शिरगाव पंचक्रोशीतील आदर्श माजी शिक्षक माननीय श्री सुरेश जांबोटकर सर यावेळी उपस्थित होते. नुकताच २०२३ -२४ चा महाराष्ट्र फाउंडेशन चे मुख्य प्रवर्तक डॉ. शामसुंदर भाकरे सर, डॉ.ज्योती भाकरे ,उपाध्यक्ष सौ. स्वाती पेटकर ,सचिव डॉ. सुमित पवार, समन्वयक श्री शंकरराव यादव सर ,फाउंडेशनचे सदस्य डॉ. अविनाश पाटील ,डॉ. अमित बिडकर, डॉ.गणेश देसाई ,डॉ. रामेश्वर गौड ,डॉ.संध्या पाटील यांनी स्वामीमय शुभेच्छा दिल्या.... डॉ विशाल पांडुरंग पेटकर श्री स्वामी समर्थ फाउंडेशन व श्री स्वामी समर्थ हॉस्पिटल शिरगाव ता.चिपळूण जि.रत्नागिरी ९६८९३६१९६८ ९८९०७८१८१८

# सीईटी प्रवेश प्रक्रियेसाठी सुसज्ज पडताळणी केंद्र उपलब्ध करणार

मुंबई : राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या (सीईटी कक्ष) तंत्रशिक्षण विभागामार्फत विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया राबवण्यासाठी सुविधा केंद्र उपलब्ध करण्यात येतात. मात्र केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेदरम्यान




काही सुविधा केंद्रांबाबत विद्यार्थी पालकांकडून येणाऱ्या तक्रारी लक्षात घेता, यंदाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी सुसज्ज सुविधा असलेले सुविधा केंद्र उपलब्ध करण्याचा निर्णय सीईटी कक्षाकडून घेण्यात आला आहे.

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत विविध व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या सामाईक प्रवेश परीक्षा व त्यावर आधारित केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येतात. त्यासाठी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या तंत्रशिक्षण विभागामार्फत विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी सुविधा केंद्रे उपलब्ध केली जातात.

केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेदरम्यान काही सुविधा केंद्रांबाबत विद्यार्थी-पालक यांचेकडून तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यामुळे २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षामधील केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेदरम्यान सुविधा केंद्रांसंदर्भात कोणत्याही प्रकारच्या तक्रारी प्राप्त होऊ नये यासाठी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने सुसज्ज सुविधा उपलब्ध असणारी सुविधा केंद्रे उपलब्ध करण्याचा निर्णय घेतला आहे. सुसज्ज सुविधा केंद्रांची निवड करण्यासाठी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने इच्छुक महाविद्यालयांकडून अर्ज मागवण्यास सुरुवात केली आहे. ६ जुलैपर्यंत महाविद्यालयांनी सीईटी कक्षाच्या संकेतस्थळावरील **https://fcreg2024.mahacet.org**२०२४.. या पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी करायची आहे.

सीईटी कक्षाच्या पोर्टलवर नोंदणी केलेल्या महाविद्यालयांमधून सुविधा केंद्रे उपलब्ध करून देण्यासाठी महाविद्यालय निवडण्यात येईल. प्रवेश प्रक्रियेसाठी निवडलेल्या सुविधा केंद्रांनी नियमानुसार प्रक्रियेचे काम योग्यरितीने पूर्ण करणे आवश्यक आहे. तसेच सुविधा केंद्रांबाबत तक्रार आल्यास संबंधित महाविद्यालयाविरोधात नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल, अशी माहिती सीईटी कक्षाकडून देण्यात आली.

# अर्थव्यवस्थेचा वेग ?

फक्त सकल राष्ट्रीय उत्पन्नच नव्हे, तर सकल राष्ट्रीय आनंद निर्देशांकही आर्थिक प्रगतीचे मानक असतो. तो संपन्न मानसिक, शारीरिक आरोग्यातून आणि विवेकशील व्यक्तिगत, सामाजिक वर्तनातून वाढतो. त्यामुळे नव्या वर्षात हा आनंदाचा निर्देशांक वाढण्यासाठी विद्वेष, विखाराचा त्याग करून विवेकी विचार - वर्तनाला प्राधान्य द्यायला हवे. काळ हे मोठे भ्रम निर्माण करणारे आणि त्याच्या पोटात काय दडलेय, याचा थांग लागू न देणारे एक मिथक असते. ब्रह्मांडातील सार्वकालिक आभास हा स्वतः काळच असतो. माणसाचे वय वाढते, तसे त्याचे शहाणपण वाढीस लागणे अपेक्षित असते. अगदी त्याप्रमाणे, काळ पुढे सरकतो तसा तो निर्माण करीत असलेला हा भ्रम ओळखून, तो डी-कोड करून, त्यातून पुढे येणारी वेळ कशी सुसंगत आणि जगण्यास सुसह्य करता येईल, यासाठी एक सार्वत्रिक शहाणपण निर्माण होणे अपेक्षित असते.

ही जाणीव ठेवूनच एखादे वर्ष संपत असताना, मागे गेलेल्या रस्त्यावर एक नजर टाकून पुढच्या वाटचालीसाठी आपल्या गती आणि मतीला योग्य दिशा देण्याचा दिवस म्हणजे ३१ डिसेंबर! सरते वर्ष भारत आणि जगाच्या दृष्टीने अनेक अर्थांनी पारखण्यासारखे होते. २०२४ ची चर्चा तर गेली काही वर्षे सुरूच आहे. याचे सर्वात मोठे कारण म्हणजे, येत्या वर्षात भारत आणि अमेरिका या अनुक्रमे सर्वांत मोठ्या आणि जुन्या लोकशाहीच्या सार्वत्रिक निवडणुका होऊ घातल्या आहेत. प्रत्येक व्यक्तीच्या आणि देशाच्या आयुष्यातही असा एक महत्त्वाचा टप्पा येतो, जो त्याचे पुढच्या काही दशकांचे भवितव्य ठरवतो. नव्या वर्षाची पहाट फटफटत असताना एवढी जाणीव प्रत्येकाला होणे, ही गोष्ट या सोनेरी पहाटेनंतरचा पुढचा दिवसही लखलखीत असण्याची शाश्वती देईल. भारत २०२३ मध्ये चांद्रयान ३ च्या माध्यमातून चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर पोहोचणारा पहिला देश ठरला. ही प्रत्येक भारतीयासाठी गौरवाची गोष्ट असली, तरी पीयूष मिश्रांच्या या नज्मची आठवण करून देणारीही आहे... एक बगल में चांद होगा, एक बगल में रोटियाँ.. एक बगल में नींद होगी, एक बगल में लोरियाँ.. हम चाँद पे रोटी की चादर डालकर सो जाएंगे... हे आठवण्याचे कारण म्हणजे भारताचा भूक निर्देशांक २९.१ आणि यातील जागतिक क्रमवारी १११ आहे, जी गंभीर स्वरूपाची समजली जाते. देशात २२५ दशलक्ष लोकांना पुरेसे अन्न मिळत नाही आणि ४० कोटी लोक रात्री उपाशी झोपतात. कोरोनाच्या संकटानंतर जागतिक अर्थनीतीला रशिया - युक्रेन आणि इस्रायल - हमास युद्धाचे जोरदार तडाखे बसले. जगाला या झळांचे चटके जाणवत असतानाही या वर्षात भारताच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात ७.६ % वाढ होऊन, हा देश आज जगातील सर्वाधिक वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था झाला आहे. पण, हे आकडे साजरीकरणासाठी पुरेसे नाहीत.

भांडवलशाही नव्या युगाच्या हातात हात घालून येते, तेव्हा तिला कुठलीही आणि कशाचीही किंमत मोजून वाढ हवी असते. आता ती केवळ नवभांडवलशाहीच्या स्वरूपातच नव्हे, तर आणखी क्रूर रूपात २०२४ मध्ये पुढे येऊ पाहते आहे. एकीकडे कर्मचारी महिलेला मूल होऊ न देण्यासाठी कॉर्पोरेट क्षेत्रात विशेष भत्ता देण्याचा विचार होणे आणि दुसरीकडे प्रगतीचा महामार्ग बनवताना भविष्याच्या अंधाऱ्या बोगद्यात ४१ कामगार १७ दिवस अडकून पडणे ही समृद्ध अर्थव्यवस्थेची करडी बाजू नव्या वर्षाचे नियोजन करताना विसरता येणार नाही.

प्रत्येक दिवसात आपल्या प्रत्येकासाठी एक भावना व्यापून राहते, तशीच एक भावना देशातही एखाद्या वर्षात दाटून आलेली असते. २०२३ मध्ये आनंदाला उधाण येण्यासारख्या अनेक गोष्टी घडल्या असल्या, तरी मणिपूरमधील हिंसाचार, जातीय - धार्मिक द्वेषातून झालेल्या हिंसक घटना, कोरोमंडल रेल्वे अपघात, समृद्धी महामार्गावर ट्रॅव्हल बस जळून झालेली दुर्घटना अशा गोष्टींचे गालबोटही लागले. त्यामुळे अर्थव्यवस्थेचा वेग प्रगतीच्या वाहनात बसू न शकणाऱ्यांना चिरडणारा आणि मानवी मूल्यांच्या चिंधड्या उडवणारा असेल, तर त्यातून साधल्या जाणाऱ्या विकासाचा कुरूप चेहरा समोर येऊ शकतो, याचे भान २०२४ साठी सज्ज होताना ठेवावे लागेल. २०२३ मध्ये जगात आणि देशात एक सार्वत्रिक भावना वाहताना दिसली, ती म्हणजे नवराष्ट्रवादाची. हा 'नव' शब्द यासाठी की यामध्ये राष्ट्राच्या अस्मितेसोबत फक्त मी आणि माझेच काय ते खरे, हा अट्टहास अधिक दिसतो. पण, मी राष्ट्रासाठी नेमके काय करू शकतो, याचा मात्र लवलेश दिसत नाही. आपण स्वत: प्रगत झालो, तर देश आपोआप प्रगती करेल. त्यामुळे नव्या वर्षात पाऊल टाकताना फुकाच्या अस्मिता सोडून आधी 'स्व'च्या विकसनावर लक्ष केंद्रित करावे लागेल.

२०२३ मध्ये आपण आणि आपले कुटुंब सर्व आघाड्यांवर किती पुढे आलो, याची गोळाबेरीज करतानाच २०२४ मध्येकिती आणि कशी प्रगती करायची, याचे नियोजन प्रत्येकाने नक्की करावे. 'हम चले ना चले, देश चल पडा हैं..' असे पंतप्रधान म्हणतात, याचा अर्थ आता काही केल्या देशाची प्रगती थांबणार नाही, असा आहे. आपण नागरिक म्हणून देशासाठी काहीच करायचे नाही, असा तो अर्थातच नाही. कला, क्रीडा, सांस्कृतिक आघाडीवर २०२३ हे वर्ष फारसे आशादायी ठरले नाही. ऑलम्पिक पदके मिळवून देणाऱ्या महिला कुस्तीपटू लैंगिक छळाच्या विरोधात कित्येक दिवस रस्त्यावर आंदोलन करीत होत्या, हे देशासाठी नक्कीच भूषणावह नव्हते. या प्रकरणानंतर अखेर क्रीडा मंत्रालयाने कुस्ती महासंघ बरखास्त करणे, हे खरे तर उशिरा सुचलेले शहाणपण. किमान आता तरी या क्षेत्रात नैतिकता, पारदर्शकता आणि गुणवत्ता वाढवण्याचे उद्दिष्ट हवे. नागरिकांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याला नव्या वर्षात मोकळा श्वास घेता येईल, यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. मावळत्या वर्षात तीन मोठ्या वास्तू पूर्ण होताना आपण पाहिल्या. वाराणसीचे जगातील सर्वाधिक क्षमतेचे स्वरवेद ध्यान मंदिर, सुरत येथील डायमंड बूर्स ही जगातील सर्वात मोठी हिऱ्यांच्या व्यापाराची इमारत आणि देशाचे नवे संसद भवन. २०२४ ची सुरुवात अयोध्येतील श्रीराम मंदिराच्या लोकार्पणाने होणार आहे. याचा अर्थ आपण आध्यात्मिक, औद्योगिक आणि लोकतांत्रिक आणि धार्मिक या चार आघाड्यांवर जगातील सर्वात मोठ्या वास्तू बांधून नेतृत्व करू पाहत आहोत, हे कौतुकास्पद आहे. पण, याला जोडून येणारी आव्हाने समजून घेत आपण सज्ज झाले पाहिजे.नव्या संसद भवनात चार बेरोजगार तरुणांनी सुरक्षा कवच भेदून देशाच्या सर्वांत महत्त्वाच्या वास्तूच्या सुरक्षेसोबत लोकशाहीच्या सार्वभौमत्वावर प्रश्नचिन्ह निर्माण केले. एकीकडे देश समृद्धीच्या वाटेवर निघाला असताना, बेरोजगार तरुण हताश होऊन माथेफिरू कृत्याकडे वळतो आहे, हा धडाही नव्या वर्षासाठी खूप महत्त्वाचा आहे. म्हणून सर्वात मोठे मंदिर जसे धर्मरक्षण करेल

# भारतीय कू होणार बंद

नवी दिल्ली: भारतीय मायक्रो ब्लॉगिंग प्लॅटफॉर्म कू बंद होणार आहे. ४ वर्षांच्या संघर्षानंतर कू बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. डेलीहंटकडून कूचे अधिग्रहण केले जाणार होते. तथापि, ते शक्य झाले नाही. टायगर ग्लोबल व एक्सेल यांसारख्या गुंतवणूकदारांकडून कूला ६० दशलक्ष डॉलरची गुंतवणूक मिळाली होती, तरीही हा प्लॅटफॉर्म तग धरू शकला नाही.




कूचे संस्थापक अप्रमेय राधाकृष्ण आणि मयंक बिद्वटका यांनी लिंक्डइनवर एक पोस्ट टाकून प्लॅटफॉर्म बंद करण्यात येत असल्याची घोषणा केली. एक्सला (पूर्वाश्रमीचे ट्विटर) टक्कर देण्यासाठी कूची सुरुवात करण्यात आली होती.

या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

दैनिक सूर्योदय

शनिवार ०६ जुलै २०२४



या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

## वाचक मनोगत

### तीन ऐवजी दोन हजार व्हावी !

तीन हजार लोकसंख्या असलेल्या गावांना नवीन ग्रंथालय मंजुरी देण्याची घोषणा उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी केली ही बाब समाधान देणारी आहे, परंतु कोकणासारख्या ठिकाणी तीन हजार लोकवस्ती असलेली गावे अभावनेच आढळतात त्यामुळे अधिकाधिक गांव या योजनेपासून वंचित राहू शकतात हे नाकारता येत नाही ? आणि म्हणूनच किमान दोन हजार लोकवस्ती असलेल्या गावांना नवीन ग्रंथालयाची मंजुरी दिल्यास अनेक गावांना त्याचा लाभ घेता येईल.विश्वनाथ पंडित ठाणे

## पालकमंत्री उदय सामंत यांचा दौरा

रत्नागिरी, दि.५ (जिमाका) : राज्याचे उद्योगमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत हे जिल्हा दौऱ्यावर येत असून, त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.ङ्ङशनिवार ६ जुलै २०२४ रोजी



सकाळी ६ वाजता कोकणकन्या एक्सप्रेसने रत्नागिरी रेल्वे स्थानक येथे आगमन व मोटारीने शासकीय विश्रामगृहाकडे प्रयाण. सकाळी ६.१५ वाजता शासकीय विश्रामगृह येथे आगमन व राखीव. सकाळी १० वाजता सी.एस.आर संदर्भात चर्चा. (स्थळ : महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, विश्रामगृह). सकाळी १०.३० वाजता उद्योग विभाग चर्चा (स्थळ : महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, विश्रामगृह) सकाळी ११ वाजता मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या शुभारंभ कार्यक्रमास उपस्थिती. (स्थळ : स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर, नाट्यगृह, रत्नागिरी)दुपारी १२ वाजता पक्षप्रवेश कार्यक्रमास उपस्थिती. (स्थळ : गोकुळ हॉल, सुनिल भोंगळे यांच्या घराशेजारी, ८० फुटी हायवे, खालची आळी, रत्नागिरी). दुपारी सोईनुसार रत्नागिरी येथून मुंबईकडे प्रयाण.

## ६५ वर्षे व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांनी ''मुख्यमंत्री वयोश्री'' योजनेचा लाभ घ्यावा

रत्नागिरी, दि. ५ (जिमाका) : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत जिल्ह्यातील ६५ वर्षे वय व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात सामान्य स्थितीत जगण्यासाठी आणि त्यांना वयोमानपरत्वे येणाऱ्या अपंगत्व, अशक्तपणा यावर उपाययोजना करण्यासाठी आवश्यक सहाय्य साधने / उपकरणे खरेदी करण्याकरिता तसेच मनःस्वास्थ्य केंद्र, योगोपचार केंद्र इ. व्दारे त्यांचे मानसिक स्वास्थ्य अबाधित ठेवण्यासाठी ''मुख्यमंत्री वयोश्री योजना'' लागू करण्यात आलेली आहे. तरी जिल्ह्यातील ६५ वर्षे वय व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांनी सदर योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांनी केले आहे.ङ्ङ या योजनेतून ज्येष्ठ नागरिकाना शारीरिक असमर्थतता / + दुर्बलतेनुसार सहाय्यभूत साधने / उपकरणे खरेदी करता येतील, त्यामध्ये चष्मा, श्रवणयंत्र, ट्रायपॉड, स्टिक व्हील चेअर, फोल्डिंग वॉकर, कमोड खुर्ची, नि- ब्रेस, लंबर बेल्ट, सर्वाइकल कॉलर इ. करिता एकरकमी रक्कम ३ हजार रुपये प्रति व्यक्ती पात्र बँकेच्या वैयक्तिक आधार संलग्न बचत खात्यात थेट वितरण प्रणालीव्दारे लाभार्थींना लाभ मंजूर करण्यात येणार आहे.

# उद्यानविद्या महाविद्यालय,मुळदे मधील ग्रामीण उद्यानविद्या कार्यानुभव कार्यक्रम





२०२४ अंतर्गत जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक शाळा इन्सुली क्र. ४ येथे फरस बाग व बीज प्रक्रियेचे प्रात्यक्षिक पार पडले. सेंद्रिय बीज प्रक्रिया ( बीजामृत ) कसे बनवावे याची माहिती दिली कृषीदूतांनी शालेय परिसरातील जमिनीची आखणी करुन विद्यार्थ्यांच्या सहाय्याने गादी वाफे व आळे बनवले व त्याबद्दलची माहिती दिली. तसेच सेंद्रिय बीज प्रक्रिया म्हणजेच बीजामृत कसे बनवावे व त्याचे फायदे विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना प्रात्यक्षिक स्वरुपात दाखविण्यात आले. फरस बाग बनवण्यासाठी शाळेतील मुलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद दिसून आला.अशाच प्रकारचे अनेक कार्यक्रम येणाऱ्या दिवसांनमध्ये इन्सुली, ता. सावंतवाडी मध्ये ह्या कृषीदुतांकडून पार पडतील.सदर गटा मध्ये प्रियश राघोबा धुरी, मल्हार संदिप महाजन, हर्षल अरुण पाटील, श्रेयस जयंत गायकवाड, ओवेश गुलाम मिर्झा नाडकर, नंदन आर, सौरजो किरण चौधरी या विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

# महा ई-सेवा केंद्रांनी शुल्कांचे फलक लावणे अनिवार्य

रायगड जिल्हा उत्तर प्रतिनिधी/मंगेश यादव

महा ई-सेवा केंद्र, आपले सरकार सेवा केंद्र, आणि सेतू केंद्रांनी आपापल्या केंद्रासमोर शुल्कांचे फलक लावणे अनिवार्य करण्यात आले आहे. ग्राहकांच्या वाढत्या फसवणुकीच्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेतला गेला आहे.ङ्ङअनेक नागरिकांनी विविध सेवा केंद्रांमध्ये दिल्या जाणाऱ्या सेवांच्या शुल्काबाबत फसवणूक झाल्याच्या तक्रारी केल्या आहेत. नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांसाठी घेतले जाणारे शुल्क, सेवांबाबत माहिती, आणि शुल्कांचे दर पत्रक स्पष्टपणे दर्शवण्याचे आदेश प्रशासनाने दिले आहेत.ङ्ङशुल्कांच्या फलकांवर केंद्रातील सर्व सेवांचे नाव, त्या सेवांचे शुल्क, आणि अन्य संबंधित माहिती स्पष्टपणे लावण्यात यावी, असे निर्देश दिले गेले आहेत. यामुळे नागरिकांना सेवा घेताना कोणतीही अडचण येणार नाही आणि त्यांना योग्य माहिती मिळू शकेल.ङ्ङज्या सेवा केंद्रांनी हे फलक लावले नाहीत, त्यांच्यावर कडक कारवाई करण्याची चेतावणी प्रशासनाने दिली आहे. या कारवाईमध्ये सेवा केंद्रांचे नोंदणी रद्द करणे, दंड आकारणे किंवा तत्सम कारवाया करण्यात येऊ शकतात.ङ्ङप्रशासनाच्या या निर्णयाचे नागरिकांनी स्वागत केले आहे. अनेक नागरिकांचे म्हणणे आहे की, शुल्कांच्या फलकामुळे सेवांचे दर स्पष्ट होणार आहेत आणि कोणतीही फसवणूक होण्याची शक्यता कमी होणार आहे.ङ्ङसेवा केंद्र चालवणाऱ्या व्यक्तींनी देखील या निर्णयाचे समर्थन केले आहे. त्यांच्या मते, शुल्कांचे फलक लावल्याने केंद्रातील कामकाज अधिक पारदर्शक होईल आणि ग्राहकांच्या तक्रारी कमी होतील.ङ्ङप्रशासनाने नागरिकांना विनंती केली आहे की, जर कोणत्याही सेवा केंद्राने फलक लावले नाहीत किंवा फलकांवर चुकीची माहिती दिली असेल तर त्यांनी तत्काळ तक्रार नोंदवावी. नागरिकांच्या तक्रारींवर त्वरित कारवाई केली जाईल, असे आश्वासन प्रशासनाने दिले आहे.ङ्ङसंपूर्ण राज्यात या आदेशाची अंमलबजावणी करण्यात येणार असून, सेवा केंद्रांनी त्वरित आपल्या दुकानासमोर शुल्कांचे फलक लावणे आवश्यक आहे. फलक लावण्याची अंतिम मुदत देण्यात आली आहे, ज्यामध्ये अनुपालन न करणाऱ्या केंद्रांवर कडक कारवाई होईल.

## राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा,दुधाला प्रतिलिटर ३५ रुपये दर देण्याचे मंत्री विखे पाटील यांचे विधानसभेत निवेदन

मुंबई,(प्रतिनिधी):आंतरराष्ट्रीय बाजारात दूध भुकटी आणि बटरचे दर कमी झाल्याने राज्यातील दूध खरेदी दरावर परिणाम झाला होता. यामुळे दूध उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत आले होते. दूध उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळावा, यासाठी दुधाला प्रतिलिटर ३० रुपये स्थायीभाव



आणि शासनाकडून ५ रुपये अनुदान देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. दुधाचे नवीन दर दि. १ जुलै पासून लागू होतील. याबाबतचे निवेदन पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी विधानसभेत केले.ङ्गमंत्री विखे पाटील म्हणाले, राज्यभरातील सहकारी तथा खासगी दूध उत्पादक संघ, आणि दूध उत्पादक शेतकरी यांची तातडीची बैठक घेऊन दूध उत्पादक शेतकरी, आणि दूध संघाच्या समस्या जाणून घेतल्या. राज्यातील सर्व खासगी तथा सहकारी दूध संघाने शेतकऱ्यांना प्रतिलिटर ३० रु. भाव देण्याचे सर्वानुमते ठरले. तसेच शासन शेतकऱ्यास ५ रुपये प्रतिलिटरचे अनुदान दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग करेल. त्यामुळे शेतकऱ्याला प्रतिलिटर ३५ रुपये मिळून शेतकऱ्यांना दिलासा मिळेल, असेही मंत्री विखे पाटील यांनी सांगितले.ङ्ङमंत्री विखे पाटील म्हणाले की, मागील काही दिवसांपासून आंतरराष्ट्रीय बाजारात दूध पावडर आणि बटरची मागणी कमी झाल्याने त्यांचे दर घसरत आहेत. यामुळे राज्यात दूध पावडरचा मोठा साठा शिल्लक आहे. म्हणून राज्यातील जे दूध प्रकल्प भुकटी निर्यात करतात त्यांना प्रोत्साहन म्हणून प्रतिकिलोसाठी ३० रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. ही अनुदानाची मर्यादा १५ हजार मॅट्रिक टनाकरिता असणार आहे.

## आठवी शिष्यवृत्ती परीक्षा गुणवत्ता यादीत समृद्धी आंबेकर ( सर्वसाधारण ग्रामीण गुणवत्ता विभागात गुहागर तालुक्यात द्वितीय क्रमांक )

आबलोली ( संदेश कदम)

इयत्ता पाचवी पूर्व माध्यमिक व इयत्ता आठवी उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला.सदर परीक्षेत गुहागर तालुक्यातील न्यू इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय पाटपन्हाळे विद्यालयातील कु.समृद्धी सुरेश आंबेकर हिने इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षा सर्वसाधारण ग्रामीण गुणवत्ता यादीत तालुक्यात द्वितीय क्रमांक संपादन केला आहे.



इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत सर्वसाधारण ग्रामीण गुणवत्ता विभागात कुमारी समृद्धी सुरेश आंबेकर हिने रत्नागिरी जिल्ह्यामध्ये ५५ वा व गुहागर तालुक्यात द्वितीय क्रमांक संपादन करून सुयशस्वी ठरली आहे. सदर परिक्षेसाठी श्री.सुशांत मुंडेकर व पाटपन्हाळे विद्यालयातील शिक्षक यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. कु.समृद्धी सुरेश आंबेकर हिने हस्ताक्षर , निबंध स्पर्धा , शुद्धलेखन , वक्तृत्व , चित्रकला स्पर्धा , विज्ञान प्रदर्शन अशा विविध राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय तसेच तालुकास्तरीय स्पर्धेमध्ये व शैक्षणिक उपक्रमांमध्ये सहभाग घेऊन सुयश संपादन केले आहे. समृद्धी आंबेकर हिने इयत्ता आठवी शिष्यवृत्ती गुणवत्ता यादीत सुयश संपादन केल्याबद्दल रत्नागिरी जिल्हा माध्यमिक शिक्षण विभागाच्या शिक्षणाधिकारी सुवर्णा सावंत , पाटपन्हाळे एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष भालचंद्र चव्हाण , उपाध्यक्षा सुचिता वेल्हाळ , सचिव सुधाकर चव्हाण व पदाधिकारी तसेच मुख्याध्यापक व्ही.डी.पाटील शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी तसेच आप्तेष्ट यांनी विशेष अभिनंदन केले.

# ग्रामीण ठिकाणी कुणबी रहिवासी संघटना दिवा शहर यांच्यावतीने वह्या वाटप कार्यक्रम

दापोली,(प्रतिनिधी):कुणबी रहिवाशी संघटना दिवा शहरामार्फत गेल्यावर्षी दिवाळी पहाट या दिवशी एक उपक्रम हाती घेत संघटनेतील ज्या सदस्याचा वाढदिवस असेल त्यांनी शालेय वस्तू स्वइच्छेनुसार द्याव्या त्याला उदंड प्रतिसाद लाभला आणि जवळ जवळ ६० डझन वह्या जमल्या. ङ्गत्या सर्व संघटनेने दापोली आणि खेड तालुक्याती चार जिल्हा परिषद शाळा त्यामध्ये आदर्श जिल्हा परिषद शाळा कोळबांद्रे, पूर्व प्राथमिक जि. प. शाळा कोळबांद्रे कुंभारवाडी व बेजेवाडी, पूर्व प्राथमिक जि. प. शाळा असोंड, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा देगाव व खेड तालुक्यातील दयाळ गावातील तीन जि. प. शाळांमध्ये संघटनेच्या वतीने



वह्या वाटप करण्यात आले. ङ्गसदर वेळी गावातील सरपंच, उपसरपंच, शिक्षण कमिटी अध्यक्ष, गाव अध्यक्ष, पोलीस पाटील, मुख्याध्यापक, शिक्षक वर्ग तसेच सदर गावांतील प्रतिष्ठित नागरिक व महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रत्येक गावामध्ये संघटनेचे स्वागत करण्यात आले. तसेच दिवा शहरातून ग्रामीण ठिकाणी येऊन विद्यार्थ्यांचा विचार केलात त्याबद्दल आभार मानण्यात आले व ग्रामीण ठिकाणी विद्यार्थी हुशार असतात पण त्यांना प्रोस्थाहन देण्याचे काम कुणबी रहिवासी संघटना दिवा शहरने केलात असा उल्लेख प्रत्येक शाळेतील शिक्षण कमिटी अध्यक्ष व मुख्याध्यापकांनी आपले मनोगत व्यक्त करताना केला. ङ्गसंघटनेच्यावतीने संघटनेचे अध्यक्ष शांताराम कांगणे, सरचिटणीस गणेश दवंडे, सह सरचिटणीस नितिन लोखंडे, कार्यकारणी सदस्य सुनील शिगवण, संतोष जोशी हे उपस्थित होते.

भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती), संपर्क : ९०४९८११०६५ मु. भिंगळोली पो.ता.मंडणगड जि.रत्नागिरी, कोकण विभागीय कार्यालय पत्ता : निलेश महादेव आखाडे ०६ र.न.प.वसाहत नाचणे रोड रत्नागिरी.४१५६१२

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफीसजवळ, माळीवेस बीड- ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालयः जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादकः गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )